**आकाशवाणी पुणे**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी ०६.०० वा.**

**दिनांक – 29/०६/२०२४** **वार – शनिवार**

---

पुण्यातील लोहगाव विमानतळावरील नव्या टर्मिनलच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाचं मनुष्यबळ गृहविभागाकडून मंजूर करण्यात आल्याची माहिती केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी आज पुण्यात पत्रकार परिषदेत दिली. नव्या टर्मिनलसाठी २२२ विविध पदांना मंजुरी मिळाली असून हे टर्मिनल लवकरात लवकर सुरु होईल असं मोहोळ यांनी सांगितलं.

**वारी**

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माउलींच्या पालखी सोहोळ्याचं आज आळंदी इथून पंढरीच्या दिशेनं प्रस्थान होत आहे. या सोहोळ्यासाठी राज्यभरातून भाविकांची गर्दी वाढल्याचं दिसून आलं. आज पहाटेपासून माऊलींचे नित्योपचार आणि भाविकांच्या महापूजेसोबत वीणा मंडपातील कीर्तन सेवा झाल्यानंतर माउलींचा महानैवेद्य झाला आणि दुपारी भाविकांसाठीचं नियमित दर्शन बंद करण्यात आलं. प्रस्थानासाठी माउलींच्या चलपादुका चांदीच्या पालखीत विराजमान झाल्यानंतर हा पालखी सोहोळा वीणा मंडपातून बाहेर पडून सर्वप्रथम मंदिर प्रदक्षिणा करेल आणि समाधी मंदिराशेजारील आजोळघरी म्हणजे जुन्या गांधी वाड्यात रात्रीच्या मुक्कामासाठी विसावेल.उद्या सकाळी हा पालखी सोहोळा पुण्याच्या दिशेनं मार्गस्थ होणार आहे.

**औषधे**

ससून रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांना बाहेरून औषधं आणावी लागू नयेत यासाठी प्रशासनानं उपाययोजना सुरू केल्या आहेत. रुग्णालयात उपलब्ध असलेली औषधं लिहून द्यावीत; बाहेरील औषधांसाठी चिठ्ठी रुग्णांना लिहून देऊ नये, असा आदेश ससून प्रशासनानं दिला आहे. अत्यावश्यक औषधांचा तुटवडा निर्माण होऊ नये, यासाठी औषध खरेदीचा निर्णय घेण्यात आल्याचं ससून प्रशासनानं सांगितलं.

सांख्यिकी

पुणे विभागीय आयुक्त कार्यालयात अर्थ आणि सांख्यिकी संचालनालयाच्या वतीनं राष्ट्रीय सांख्यिकी दिनानिमित्त कार्यशाळा संपन्न झाली. विख्यात सांख्यिकी शास्त्रज्ञ प्राध्यापक प्रशांत चंद्र महालनोबीस यांच्या महत्त्वपूर्ण योगदानाबद्दल त्यांचा जन्मदिवस राष्ट्रीय सांख्यिकी दिन म्हणून दरवर्षी २९ जून रोजी साजरा करण्यात येतो. केंद्र शासनानं या वर्षी 'निर्णय प्रक्रियेसाठी आकडेवारीचा वापर हे घोषवाक्य जाहीर केलं आहे. देशाचं तसंच राज्याचं दर डोई उत्पन्न काढण्यासाठी लागणारी आकडेवारी सांख्यिकी विभागामार्फत गोळा केला जाते. ही आकडेवारी कशी गोळा करायची आणि त्याचं महत्त्व याबाबत कार्यशाळेत मार्गदर्शन करण्यात आलं.

**कर**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या करसंकलन विभागानं मालमत्ता करावर दिलेल्या विविध सवलतींचा लाभ घेत साडेतीन लाखांहून अधिक करदात्यांनी ४०० कोटींहून अधिक कराचा भरणा केला आहे. यामध्ये ३ लाख २५ हजार नागरिकांनी आपला चालू आर्थिक वर्षाचा मालमत्ताकरासह थकीत कराचासुद्धा भरणा केला आहे. सवलतींचे दोनच दिवस शिल्लक असून नागरिकांनी त्याचा लाभ घेण्याचं आवाहन करसंकलन विभागाचे सहाय्यक आयुक्त नीलेश देशमुख यांनी केलं आहे.

**चौधरी**

नुकतीच पार पडलेली लोकसभा निवडणूक ही मतदारांचा राज्यकर्त्यांवर अंकुश ठेवणारी होती, असं मत ज्येष्ठ पत्रकार आणि राजकीय विश्लेषक नीरजा चौधरी यांनी व्यक्त केलं. पुणे श्रमिक पत्रकार संघ आणि व्यंकटेश चपळगावकर मित्र परिवारातर्फे आयोजित व्याख्यानात आजची राजकीय पत्रकारिता आणि निवडणुका या विषयावर त्या बोलत होत्या. संसदेत फक्त गदारोळ करून चालणार नाही तर ठाम भूमिका विरोधी पक्षाला घ्यावी लागणार असल्याचं चौधरी म्हणाल्या.

**वारकरी**

वारकरी संप्रदायाचं  महत्त्व बालकांमध्ये लहानपणापासूनच रूजविणं गरजेचं असल्याचं मत ह.भ.प. तुकाराम महाराज गरूड ठाकुरबुवा दैठणेकर यांनी आज आळंदी इथं व्यक्त केलं.  आळंदी येथील विश्वशांती केंद्र , पुण्यातील माइर्स एमआईटी आणि श्री क्षेत्र आळंदी देहू परिसर विकास समिती यांनी संयुक्तपणे आयोजित केलेल्या लोकशाही, मानवधिकार, शांती आणि सहिष्णुतेसाठी लोकशिक्षणपर उपक्रमाच्या प्रसंगी ते बोलत होते.

**टँकर**

पुण्यात वानवडी इथं भरधाव अल्पवयीन टँकरचालकानं आज सकाळी व्यायामासाठी बाहेर पडलेल्या काही मुलांना तसंच, एका दुचाकीला धडक दिली. या अपघातात काही मुलं आणि एक महिला गंभीर जखमी झाली आहे. टँकरचालक मुलगा १४ वर्षांचा होता. त्याला पोलिसांनी ताब्यात घेतलं. दुचाकीवर मागे बसलेली महिला उडून समोर रस्त्यावर पडली. तर, दोन मुली टँकरखाली अडकल्या, त्यांचे प्रशिक्षक संतोष ढुमे यांनी त्यांना बाहेर काढलं.

डेंग्यू-भूषण

पिंपरी शहरातील चौदाशेहून अधिक घरांमध्ये डेंग्यूच्या अळया सापडल्या आहेत. या घरमालकांकडून ७२ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला आहे. आरोग्य विभागाच्या पथकांनी गेल्या २२ दिवसांमध्ये  १ लाखांहून अधिक घरांची तपासणी केली. डेंग्यूसदृश्य आजारानं बाधित रूग्णांची संख्या ४८०, तर चिकनगुनियाच्या संशयित रूग्णांची संख्या १६ आहे असं पिंपरी आरोग्य विभागाचे सहायक आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितलं.

**पापु**

खडकवासला जॅकवेलमध्ये शॉर्टसर्किटमुळे आज पाणीपुरवठा यंत्रणा बंद पडली आहे. सकाळी साडेसहापासून दुरुस्तीचं काम सुरू आहे. पाणीपुरवठा सुरळीत होण्यास रात्रीचे १२ वाजतील असं महापालिकेनं कळविलं आहे.

**स्वरमल्हार**

स्वरमल्हार संगीत महोत्सवाला आजपासून पुण्यात सुरुवात झाली असून राग मल्हारच्या अनेकविध छटांचा आनंद घेत गायन आणि सतार वादनामधून बरसणाऱ्या मेघसरी आज पुणेकरांनी अनुभवल्या. आरंभी 'मल्हार के रंग' या कार्यक्रमात रश्मी मोघे, सुरंजन खंडाळकर, श्रुती देशपांडे, शुभम खंडाळकर आणि साई पांचाळ यांचं गायन झालं. उत्तरार्धात सतारवादक पूर्बायन चॅटर्जी यांनी पुणेकरांच्या मनांच्या तारा छेडल्या.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**